RNI No. MAHBIL /2009/37831

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग चार—ब

वर्ष ७, अंक ११६] गुरुवार, सप्टेंबर २३, २०२१/आश्विन १, शके १९४३ [पृष्ठे २, किंमत : रुपये ९.००

### असाधारण क्रमांक २६९

### प्राधिकृत प्रकाशन

महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र अधिनियमांन्वये तयार केलेले
(भाग एक, एक-अ आणि एक-ल यांमध्ये प्रसिद्ध केलेले नियम व आदेश यांव्यतिरिक्त) नियम व आदेश.

महसूल व वन विभाग
मंत्रालय, मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक, मुंबई ४०० ०३२
दिनांक ८ सप्टेंबर २०२१

अधिसूचना

**महाराष्ट्र मुद्रांक अधिनियम.**

क्रमांक मुद्रांक-२०२१/६८/प्र.क्र. ६९/म-१ (धोरण).— महाराष्ट्र मुद्रांक अधिनियम, १९५८ (१९५८ चा ६०) याच्या कलम १०ड च्या पोट-कलम (१) द्वारे प्रदान केलेल्या अधिकारांचा वापर करून, महाराष्ट्र शासन, याद्वारे, शासकीय अधिसूचना, महसूल व वन विभाग, क्रमांक मुद्रांक २०१५/१०४९/प्र.क्र. (३३४)/म-१, दिनांक ३ जून २०१६ यामध्ये पुढीलप्रमाणे सुधारणा करीत आहेत :—

उक्त अधिसूचनेस जोडलेल्या अनुसूचीमधील, अनुक्रमांक ८३, ८४, ८५, ८६ व ८७ येथील नोंदींऐवजी पुढील नोंद दाखल करण्यात येईल :—

| | | |
|---|---|---|
| "८३. | राष्ट्रीयकृत बँका, सार्वजनिक क्षेत्रातील बँका, बहुराज्यीय अनुसूचित बँका, सर्व सहकारी बँका, सर्व खाजगी बँका, विदेशी बँका आणि बँकेतर वित्तीय कंपन्या. | ऋणाची अभिस्वीकृती (अनुच्छेद-१), प्रतिज्ञालेख (अनुच्छेद-४), सुविधा करारनामा किंवा कर्ज करारनामा (जर तो गहाणखत, हक्क विलेख-निक्षेप, हडप, तारण किंवा तारण गहाण यामध्ये मोडत नसेल तर) [अनुच्छेद-५(ह) (अ) (चार)], जंगम मालमत्तेचे तारण किंवा तारण गहाण [अनुच्छेद-६(२)], बंधपत्र (अनुच्छेद-१३), क्षतिपूर्ति बंधपत्र (अनुच्छेद-३५), मुखत्यारनामा (अनुच्छेद-४८ [अनुच्छेद ४८ (फ) वगळून], नौमार बंधपत्र (अनुच्छेद-५३), प्रतिभूती बंधपत्र (अनुच्छेद-५४).". |

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**श्रीधर डुबे-पाटील,**
शासनाचे सहसचिव.